# मनतरंग - ३

आज घरातली आवरा-आवर करताना अचानक त्याचं पत्रं हातात आलं आणि स्वतःच्याही नकळत तिच्या डोळ्यांच्या कडा  ओलावल्या, पोटात कालवाकालव झाली. आपण मन लावून, काहीतरी शिवणकाम करत असतो आणि मधेच बोटात सुई टोचून रक्ताचा लालबुंद थेंब टरटरुन वर येतो, तसंच काहीसं तिचं झालं. मग स्वतःचाच प्रचंड राग आला. अजूनही त्याच्या खुणा का सापडतात इथे-तिथे? मनाच्या आड, दृष्टीच्या आड केल्या गोष्टी की वाटते संपले सगळे.. आता कधीच, कुठे, काहीच नाही गवसणार. पण आजच्यासारखी वेळ आली की जाणवते किती संभ्रमात असतो आपण ते..

असेही त्या दोघांच्यात आठवून ओठांवर हसू फुटण्यासारखे क्षण अगदी दोन-चारच असतील पूर्ण बारा-तेरा वर्षांच्या सहजीवनात. सहजीवन!, किती सहज म्हणून जातो ना आपण हा शब्द. एकत्र राहिलं केवळ म्हणून होतं का सहजीवन? असो, जे काही होतं, ते संपून मध्ये बराच काळ लोटला होता. एकमेकांच्या समोरा-समोर आले तरी हाय-हॅलो कोरडेपणाने करण्याएवढे दोघेही सरावले होते. आपापल्या सध्याच्या आयुष्यात सुखी-समाधानी होते. तिला वाटलंही नव्हतं की त्याच्यासाठी तिच्या मनाचा एक कोपरा अजून असा ओला होईल.. पण ओला झालेला कोपरा त्याच्याचसाठी होता का? तिने परत एकदा स्वतःच्या मनाला चाचपले. नाही बहुदा. सगळंच कोरडं कोरडं झाल्यावर, मनाचा दगड झाल्यावर मगच तर तिने तो निर्णय घेतला होता. तेंव्हा त्याच्या या पत्राने तिचं मन क्षणभर सुद्धा हाललं नव्हतं. कागदावरच्या त्याच्या वाकड्या-तिकड्या शब्दांवर तिची कोरडी नजर फिरली होती, तेवढीच दखल घेऊ शकली होती ती तेंव्हा. आजचं ओलावलेलं मन बहुदा तिनं तिच्या त्या भोगांना दिलेली तिलांजलीच होती.. असणार…

मनातले विचार झटकून हातातले ते पत्र तिने टरा-टरा फाडून टाकले आणि पुढचा खण आवरायला घेतला…पण तिच्या कपाळावर एक अदृश्य अठी उमटून राहिली.

……मागून तो कधी आला आणि त्याने तिला मिठीत कधी भरले हे कळलेच नाही तिला. अलगद गालावर खट्याळ हसू उमटले आणि त्याचे ओठ हलकेच तिच्या कपाळावर विसावले..तेंव्हा.. कपाळावरची ती अठी तिच्याही नकळत पुसून गेली..

.. एकाच जन्माच्या दरम्यान किती प्रकारची आयुष्यं जगतो ना आपण ?

**©प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**